Vol 6 Issue 4 May 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 4 | May - 2016

Indian Streams Research Journal





# 'दर कोस दर मुक्काम' म्हणजे आधार देणा–या माणसाचे चित्रण

संजय वसंतराव वारके

**प्रस्तावना** :

भटक्या विमुक्तामधील नव्या पिढीचे लेखक अशोक पवार यांची 'इळनमाळ' या कादंबरीनंतरची दुसरी कादंबरी म्हणजे 'दर कोस दर मुक्काम' मनोविकास प्रकाशन,पुणे यांनी २०१० मध्ये प्रकाशित केली आज तिच्या तीन आवृत्त्या निघाल्या आहेत. पारधी समाजाची व्यथा या कादंबरीत अशोक पवारांनी मांडली आहे.

पारधी जमात भटकंतीचे जीवन जगते. शिकार करुन पोट भरणे हा मूळ व्यवसाय असला तरी, शिकारीवर पोट भरत नाही. भीक मागूनच जगावे लागते. पोट भरण्यासाठी प्रसंगी चोरी करावी लागते. पारध्यांकडे चोर म्हणूनच समाज पाहतो. 'दर कोस दर मुक्काम' मधील पारधी पोट भरण्यासाठी दारुचा धंदा करतात. पाटील, सरपंच, पोलीस पाटील यांच्या त्रासाने धंदा बंद करुन मध्यप्रदेशात चोरीसाठी जातात. पैसे लागतात म्हणून कधी–कधी दादा लोकांकडून पैसे घेतात. वाईट कामे करतात; पण आपल्या हातून पैशासाठी एखाद्याचा खून होऊ नये म्हणून खबरदारी घेतात. ज्या गावात राहतो त्या गावातील लोकांशी गोड बोलतात; पण गाववाले पारध्यांना जवळ करत नाहीत याविषयी डॉ.रमेश जाधव लिहितात, ''पारधी कितीही इमाने इतबारे जीवन कंठत असले तरी नालायक व हरामखोर म्हणूनच बघण्याची सवयच मनात खोलवर रुजलेली आहे'' स्वातंत्र्याच्या पासष्ट वर्षानंतरही भटक्याकडे विशेषतः पारधी लोकांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदललेला नाही.

'दर कोस दर मुक्काम' मध्ये पारधी जमात सुरुवातीपासून शेवटपर्यंत भटकंती करते. भटकंतीमुळे अस्वच्छता, व्यसनाधिनता, गुन्हेगारीवृती, अंधश्रध्दा, उपासमार, पोलीस व गावकरी यांचे अत्याचार या सगळयांची भटक्यांना सवय असते. किंबहुना हेच त्यांचे जीवन असते असेच लेखकाने चित्रित केले आहे. याविषयी डॉ.अनंता सूर म्हणतात, ''पारध्यांच्या वाट्याला गावोगाव फिरतांना जे दुःख आलं, त्या दुःखाची प्रत किती भयावह आहे, याचा प्रत्यय सुजाण वाचकांना पवारांनी करुन दिला. हे जगणे केवळ पारध्याचेच आहे. सामान्य माणसासारखे प्रामाणिकपणे जगणे त्यांच्या वाट्याला यावे ही त्यांची इच्छा आहे. ही भूमिका उरी बाळगून पवारांनी 'दर कोस दर मुक्काम' ही काबंदरी जन्माला घातली असावी.''२ पारध्यांच्या जगण्याची दाहकता जरी काबंदरीत दिसत असली तरी भटके हे सुख–दुःखाचे वाटेकरी असतात, तीन दगडाचे सोबती असतात, अज्ञानी असले तरी समजदार असतात हे पवारांनी जाणीवपूर्वक मांडले आहे.

'दर कोस दर मुक्काम' मध्ये आधार देणा–या माणसांचे चित्रण आहे. वेळोवेळी ही माणसे एकमेकाला धीर देतात, मदतीचा हात देतात, वयस्क माणसाचा आदर करतात. त्याचे ऐकतात. पालावर सर्व लोकांमध्ये लकसीमन बुढा हा वयस्कर असतो. पाल एका ठिकाणाहून दुस–या ठिकाण हलवताना काही रीतीरिवाज पूर्ण करण्याची जबाबदारी बुढा पार पाडतो. गायीवर बिराड लादून जागा सोडण्यापूर्वी लकसीमन बुढा सूर्याकडे तोंड करुन एका पायावर उभा राहून हात जोडतो. माती उचलून कपाळाला लावतो. मग म्हणतो, ''किसन्या, ह्यो अंगारा घी, समद्यास्नी लाव'' (दर कोस दर मुक्काम, पृ.५) यानंतरच जागा सोडली जाते. एका गावाहून दुस–या गावात पोहचेपर्यंत सर्व जबाबदारी लकसीमान बुढा घेतो. मध्ये विश्रांती घ्यायचे ठिकाण व वेळ तोच ठरवतो. लेहगाववरुन पुढे चालत जात असतांना मध्येच सर्वजण विश्रांती घेतात मात्र विश्रांतीनंतर लवकर उठत नाहीत. लकसीमन बुढा झोपत नाही.

त्याला उद्याची काळजी असते. इच्छित ठिकाणी पोहचणे हे त्याचे उद्दिष्ट असते. यासाठी तो गडबड करत असतो. तो म्हणतो, ''आरं काय खाऊन निजल्याती, चला उठा आवरा, तुम्हाला काई काळजी हाय की न्हाई. मस्त राजावानी झोपल्याती. म्या नसल्यावर ह्या बिराडाचं काय होईल, देवच जानो.''(दर कोस दर मुक्काम, पृ.७) सर्व बिराडाची काळजी तोच वाहतो. त्याच्या शब्दाला सगळे मान देतात, त्याचा आदर करतात. एकदा त्याच्या जावयाने त्याला शिव्या दिल्या तर सर्वांनी मिळून त्याच्या जावयाला मारले. गाववाले पालावर आले तरी तोच बोलतो. गावात कुणाला भेटायचे असले तरी तोच भेटतो. सादुबाच्या अंगात देव आल्यावर प्रश्न विचारायची जबाबदारी तोच पार पाडतो.

पारध्यांची मुले आश्रमशाळेत शिकतात. त्या मुलांना पालावरुन शाळेत व सुट्टीला शाळेतून पालावर ने–आण करण्याची जबाबदारी लकसीमन बुढा पार पाडतो. पहिल्यांदा मुलांना शाळेत दाखल केल्यावर दोन दिवस शाळेत राहतो. मुलांची खाण्या–पिण्याची सोय कशी आहे याची चौकशी करतो. तिथल्या शिक्षकांना, संस्था चालकांना भेटतो, हात जोडतो. चौकीदाराशी गोड बोलतो. मुलांकडे लक्ष द्यायला सांगतो. मुलांनाही व्यवस्थित राहण्याविषयी सांगून पालावर येतो. पालावर आल्यावर मुलांच्या आई–वडिलांना सर्व माहिती सांगतो. धीर देतो. पोलीस आले किंवा स्टेशनमध्ये जायची वेळ आलीच तर बुढाच पुढे असतो. पारध्यांची बाजू मांडतो. या सर्व गोष्टींमुळे सर्व पारध्यांना लकसीमन बुढा हा आपला आधार आहे असे वाटते.

पारध्यांना आधार देणारी दुसरी व्यक्ती म्हणजे कांबळे साहेब. गस्तीच्या निमित्ताने पालावर येतात. उघड्यावरचे जीवन बघतात. पोलीस स्टेशनमध्ये बोलावतात. मुलांना शाळेत पाठवण्याविषयी सांगतात. त्यांची गरिबी पाहून स्वतः राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमशाळेत प्रमुखांना फोन करतात. सर्व पारध्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. पारध्यांना मार्गदर्शन करतात. गाववाले व पारधी यांच्यात ज्यावेळी संघर्ष सुरु होतो त्यावेळी कांबळे साहेब पारध्यांची बाजू घेतात. त्यांना पोलीस स्टेशनमधून घरी पाठवतात. सगळे पारधी साहेबांच्या पाया पडतात. याचा परिणाम मात्र वाईट होतो. कांबळे साहेबांनी पारध्यांकडून पैसे खाल्ले असे वर्तमानपत्रात छापले जाते. एवढेच नव्हे तर विधानसभेत याचे पडसाद उमटतात. राज्याच्या गृहमंत्र्यानी पारधी चोर असतात याची कबुली दिली आणि ठाणेदार साहेब कांबळे यांची बदली गडचिरोली याठिकाणी होते. कांबळे साहेब घाबरत नाहीत. जातांना ते पारध्यांना सांगतात, ''माझी बदली झाली. नवीन आलेला ठाणेदार चांगला आहे. तुम्हाला न्याय मिळेल. तुम्ही काही दिवस येथे राहा. न्याय मिळवा, मग जा.'' (दर कोस दर मुक्काम, पृ.५२) कांबळे साहेब सहसा बाहेर कोठेही जेवायला जात नाहीत; पण आपल्या पत्नीसह ते पालावर जेवायला येतात. पारधी स्त्रिया त्यांना ओवाळतात. आपुलकीने जेवायला वाढतात. या प्रसंगी बुढा म्हणतो,''आजपासवर आमचं आन पोलीसाईचं छत्तीसचच –हाईल. पोलिसाईनं जवा म्हणाल तवा मारलंच.. पण आज सायब हामी धन्य झालो. तुम्ही हामचे देव हाईत. आम्ही तुमचे पाय धुवून पेले तरी तुमचे उपकार फिटणार नाहीत.'' (दर कोस दर मुक्काम, पृ. ४४) पारधी समाजाला दिशा दाखवणा–या कांबळे साहेबांचे चित्रण एक मार्गदर्शक म्हणूनच कादंबरीत आले आहे.

याबरोबरच पारधी समाज मेश्राम या कार्यकर्त्यांच्या आधाराने जीवन जगतो. त्याचे काम करुन देणे, पैसे घेणे, अडचणीच्यावेळी मदत घेणे, दुकानदाराला सांगून उधार द्यायला लावणे हे काम मेश्रामची मदत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमशाळेतील देशपांडे सर भला माणूस आहे. गुलब्याचे गुण ओळखून, त्याची हुशारी पाहून हे त्याला घरी नेतात, जेवू घालतात, पैसे देतात. दहावीनंतर मार्गदर्शन करतात. त्यांची पत्नीही प्रेमळ आहे. याच शाळेतील चौकीदार पांडूमामा खूप प्रेमळ आहे. ज्या ज्या वेळी लकसीमन बुढा शाळेत येईल त्यावेळी त्याची सोय करतो. जाताना एस.टी.स्टॅण्डपर्यंत सोबत करतो. या शाळेचे अध्यक्षही चांगले आहेत. पारध्यांच्या मुलांचा अस्वच्छ अवतार बघून ते म्हणतात, ''हेडमास्तर, समद्या स्टाफकडून वर्गणी वसूल करा, आन ह्या लेकरांना नवी कापडं घेऊन द्या.'' (दर कोस दर मुक्काम, पृ.३८) पारध्यांना माणूस म्हणून आपुलकीची वागणूक शाळेत मिळते.

पारध्यांच्या सर्व मोठ्या माणसांना पोलीस पकडून नेतात, त्यांना शिक्षा होते तेव्हा सर्व लहान मुलांना आंधळा नाम्या आधार देतो. भीक मागून मुलांना जगवतो. चालत चालत तो मुलांना मोझरीला नेतो. गुलब्या व कमला या नववीतील मुलांना भेटतो. मुलांना जगवण्यासाठी शाळा सोडा म्हणतो, कमला त्यांच्यासोबत जाते व मुलांना आई–वडिल येईपर्यंत जगवतात. स्वतः आंधळा असूनही दुस–यांना आधार देणारा नामा अशोक पवार यांनी चित्रित केला आहे. पारधी चोर आहेत असे सगळे म्हणत असले तरी अनेक चांगली माणसे आहेत जी आधार देतात.

पारधी भटकंती करत असताना इतर भटक्या जाती जागोजागी भेटतात. ते सर्व तीन दगडाचे सोबत असतात. ते एकमेकांना आधार देण्याचे काम करतात. भटक्याच्या जमाती अनेक असल्यातरी त्यांचे परस्परांशी प्रेमाचे नाते असते. अशा प्रकारे 'दर कोस दर मुक्काम' या कादंबरीत लकसीमन बुढा, कांबळे साहेब, कार्यकर्ता मेश्राम, देशपांडे सर, आश्रमशाळेतील स्टाफ, आंधळा नामा व इतर अनेकजण पारध्यांना आधार देतात. 'दर कोस दर मुक्काम' ही आधार देणा–या माणसांचे चित्रण करणारी कादंबरी आहे.

### संदर्भ


अशोक पवार : दर कोस दर मुक्काम
मनोविकास प्रकाशन, पुणे,
तिसरी आवृत्ती, २०१५.

डॉ.रमेश जाधव : गोरवाणी, संपा. रमेश जाधव,
औरंगाबाद, २०११, पृ.१३.

डॉ.अनंता सूर : आमची श्रीवाणी, संपा.म.बा.शहा,
कालवाणी प्रगत मराठी अध्ययन संस्था,
सप्टे.२०११, पृ.५४

| | | |
|---|---|---|
| लेखक | : | संजय वसंतराव वारके<br>रुकडी, जि.कोल्हापूर |
| फोन नं. | : | ९४२१२०५१२२ |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org